
# अमृत

-मो. ग. रांगणेकर



ग. पां. परचुरे
प्रकाशन मन्दिर मुंबअी

# अमृत

[चार-अंकी संगीत सामाजिक नाटक]

मो. ग. रांगणेकर

प्रकाशन क्रमांक १५९

ग. पां. परचुरे प्रकाशन मन्दिर, मुंबई ४

मूल्य दोन रुपये

प्रकाशक :
विष्णु गजानन परचुरे
ग. पां. परचुरे प्रकाशन मन्दिर
गोरेगांवकर चाळ क्र. २
गिरगांव, मुंबअी ४

पहिली आवृत्ति
फेब्रुवारी १९५८

मुखपृष्ठ सजावट
गोपाळकृष्ण भोबे

मुद्रक :
वि. पु. भागवत
मौज प्रिंटिंग ब्यूरो
खटाववाडी, मुंबई ४

मो. ग. रांगणेकरकृत "अमृत" या नाटकाचा पहिला प्रयोग नाट्य-निकेतन (प्रा.) लि. नें आपल्या नाट्यमहोत्सवांत बुधवार ता. २६ फेब्रुवारी १९५८ रोजीं अमर हिंद मंडळ, दादर येथें केला. त्या प्रयोगांत भूमिका करणाऱ्या नटनटी :

| | |
|---|---|
| जयंता | **बालकराम** |
| रघुनाथ | **अरुण सरनाईक** |
| आई | **मंदाकिनी भडभडे** |
| कालिंदी | **ललिता होनावर** |
| पुष्पा | **वसुंधरा पौडवाल** |

संगीत : **डी. पी. कोरगांवकर**

या नाटकाचा संपूर्ण अगर कांहीं भागाचा रंगभूमीवर प्रयोग करावयाचा असल्यास अगर पुस्तकांत प्रसिद्ध करावयाचा असल्यास त्या बाबतींत प्रथम खालील पत्त्यावर लेखकाची परवानगी घेणें जरूर आहे. परवानगीखेरीज असा उपयोग केल्यास कायदेशीर इलाज केला जाईल.

२०–२–१९५८
मॉडेल हाऊस
प्रॉक्टर रोड, मुंबई ४

**मो. ग. रांगणेकर**

PANDIT CENTRE FOR ... RESEARCH IN INDIAN THEATRE
Date..........
ESTD. 1981

# १

*जयंता फडणीस आणि त्याची आई राहात असलेला छोटासा 'फ्लॅट'. बाहेरच्या हॉलमध्यें टापटिपीचें फर्निचर, एक ग्रामोफोन, पुस्तकांचें 'शेल्फ', दोन-चार सुंदर तसबिरी, मध्यभागीं जयंताच्या वडिलांचें एक 'एन्लार्जमेंट' दिसत असून, प्रेक्षकांच्या उजव्या बाजूला एक लहानशी बाल्कनी, त्यानंतर बाहेरून येण्याचा दरवाजा व त्याच्या पलिकडे एक खिडकी आहे. समोर डाव्या बाजूस आंतल्या खोलींत जाण्याचा दरवाजा आहे.*

*संध्याकाळचे साडेसहा वाजून गेले आहेत. जयंताची आई खिडकींत उभी राहून व मधून मधून बाहेरच्या दरवाज्यांतून बाहेर फेऱ्या मारीत त्याच्या येण्याची वाट पाहात आहे.*

*जयंताचा मित्र रघुनाथ 'पेशन्स'चा डाव मांडून एका आराम-खुर्चीवर बसला आहे. ग्रामोफोनवर एक रेकॉर्ड वाजते आहे, व रघुनाथ खेळतां खेळतां शीळ वाजवीत त्या गाण्याला साथ करीत आहे. मधून मधून जयंताच्या आईची अस्वस्थता पाहून तो स्वतःशींच हंसत आहे.*

*रेकॉर्ड संपते आणि रघुनाथ ती बदलण्यासाठीं उठतो.*

**आई :** अजून आला नाहीं जयंता. किती वाजले रे रघू?

**रघुनाथ :** *(हातांतलें घड्याळ पाहून)* साडेसहा वाजून साडेतीन मिनिटं झालीं.

**आई :** म्हणजे आतां थोड्या वेळानं सात वाजतील. आणि अजून हा आला नाहीं!

**रघुनाथ :** तूं खिडकींत उभी राहिलीस, म्हणजे तो लवकर येणार आहे वाटतं? चल, आपण 'रमी' खेळूं या तो येईपर्यंत. 'बस' मिळाली नसेल—झाला असेल त्याला उशीर.

**आई :** *(त्याच्या खुर्चीसमोर येऊन बसत)* पण एवढा वेळ? ऑफिस तर साडेपांच वाजतां सुटतं. फार तर पंधरावीस मिनिटं 'बस'ची वाट पाहात राहावं लागत असेल. घरीं पोंचायला सात-आठ मिनिटं लागतात, असं तोच म्हणायचा पूर्वीं—आणि अलिकडेच असा उशीर करूं लागलाय.

**रघुनाथ :** *(पत्ते वांटून)* हं, घे. या 'बसिस्'चं कांहीं सांगतां येत नाहीं, मावशी. केव्हां केव्हां तर जागा मिळायला एवढा उशीर लागतो, कीं त्यापेक्षां चालत येऊन लवकर घरीं पोंचतो माणूस.

**आई :** पण पूर्वीं नाहीं का यायचा सहा वाजण्यापूर्वी?

**रघुनाथ :** मावशी—मावशी—तुला अजून कसं कळत नाहीं?

**आई :** काय तें?

**रघुनाथ :** पान टाक.—अग, हें वय मोठं खराब असतं. या वयांत घरीं यायला उशीर व्हायचाच! मी तर नऊ वाजतां घरीं यायचा; त्या मानानं जयंता सात वाजेपर्यंत तरी येतो.

**आई :** कुठं जातां तुम्ही? सिनेमाला?

**रघुनाथ :** हं—सिनेमाला—फिरायला—हॉटेलच्या 'फॅमिली रूम'मध्यें—पान टाक.

**आई :** पण जयंता नाहीं कधीं हॉटेल बिटेलांत जायचा. त्याच्यासाठीं रोज कांहींतरी खायला करून ठेवतें मी—माहित आहे त्याला.

**रघुनाथ :** त्याला एकट्यालाच करून ठेवतेस?—त्याच्याबरोबर आणखी कुणी असलं तर?

**आई :** वाः रे तूं! तूं आलास तर तुला दिल्याशिवाय राहातें होय?

**रघुनाथ :** मावशी—मावशी—आतां कसं सांगूं तुला?

**आई :** कांहीं सांगूं नकोस.—किती वाजले बघ.



**रघुनाथ :** आतां साडेसहा वाजून सव्वानऊ मिनिटं झालीं. *(आई खिडकी-जवळ जाऊन येते.)* उद्यांपासून त्याला टॅक्सींतून यायला सांग, मावशी.

**आई :** निदान आज तरी सांगायला हवं होतं.

**रघुनाथ :** कां ग? कुणी येणार कीं काय त्याला मागणी घालायला?

**आई :** छेः रे. आज त्याचा वाढदिवस आहे ना?

**रघुनाथ :** खरं का? मला सांगितलंच नाहीं त्यानं. दुपारीं भेटला होता ऑफिसांत.

**आई :** किती वाजतां घरीं येतों म्हणाला होता?

**रघुनाथ :** अग, मी कुठं विचारलंय् त्याला?

**आई :** आज महिनाभर असं चाललंय त्याचं. विचारलं तर म्हणतो, कुठं ऑफिसांतच काम निघालं, नाहींतर 'बस' मिळेना, नाहीं तर कुणातरी मित्रानं च्हा प्यायला घरीं ओढून नेलं. पण मी साडेपांच वाजल्यापासून डोळ्यांत प्राण आणून वाट पाहात असतें, हें कांहीं त्याला कळत नाहीं.

**रघुनाथ :** लहान आहे तो.

**आई :** लहान कसला? आज पंचविसावं वर्ष लागलं त्याला.

**रघुनाथ :** मग बरोबर. मोठा झाला तो! आतां कसा वेळेवर घरीं येईल?

**आई :** अरे, पण मला का मोठा आहे तो?

**रघुनाथ :** मग आज काय त्याला मांडीवर घेऊन भरवणार आहेस?

**आई :** हो—भरवीन हो.

**रघुनाथ :** अग, मग त्या भयानंच तो येत नसेल अजून घरीं. *(हंसतो.)* आतां लग्न करून टाक मावशी त्याचं.

**आई :** लग्न?

**रघुनाथ :** हं. म्हणजे बघ, सहाच काय—पांच वाजतांच पळत येईल तो ऑफिसांतून घरीं.

**आई :** आईपेक्षां बायकोची ओढ जास्त लागणार का रे त्याला? वेडाच आहेस तूं!

**रघुनाथ :** ठीक आहे. आतां आला घरीं म्हणजे विचारतों त्याला.—ही बघ माझी 'रमी' झाली.

**आई :** असलं कांहीं तरी भरवूं नकोस बाबा त्याच्या डोक्यांत.

**रघुनाथ :** अग, पण त्याच्या लग्नाच्या तयारीला लागायलाच हवं तुला आतां. ही पंचविशी मोठी वाईट असते. तूं कांहीं धडपड केली नाहींस, तर तोच कुठं तरी धडपडायचा !

**आई :** माझा जयंता असा इतर मुलांसारखा नाहीं रघू. तो बोलला नाहीं, तरी त्याच्या मनांतलं सारं कांहीं कळतं मला.

**रघुनाथ :** मग त्याला आज महिनाभर घरीं यायला उशीर कां होतो, तें ओळख बघूं.

**आई :** अरे, कुठं ऑफिसांत जास्त काम असतं, नाहींतर 'बस'ची वाट पाहात राहावं लागतं.

**रघुनाथ :** या महिन्यांतच 'बसिस्' मध्यें गर्दी व्हायला लागली वाटतं ? अग मावशी, या वयांतच ऑफिसांत जास्त काम निघतं—'बसिस्' वेळेवर येत नाहींत—मित्र घरीं चहाला बोलावतात—

**आई :** म्हणजे तूं म्हणतोस तरी काय ? जयंता मला खोटं सांगून फसवतो ?

**रघुनाथ :** छेः छेः, आपला माझा अनुभव सांगितला तुला. पटला तर पाहा.

**आई :** नाहींच पटायचा. जयंता माझा आहे आणि तो माझाच राहणार.

**रघुनाथ :** अग, मी कुठं नाहीं म्हणतों ? पण आईला आपलं मूल कितीही जीव कीं प्राण वाटलं, तरी त्या मुलाला पंख फुटले असल्यामुळं बाहेरच्या जगांत नवीन नवीन नातीं येऊन चिकटतात, त्याला काय करणार ? आईला त्याच्याशिवाय कुणी नसतं खरं; पण त्याला बाहेरच्या जगांत मित्र भेटतात—मैत्रिणी भेटतात—त्याच्या मनाला ओढ लागणाऱ्या अनेक गोष्टी आढळतात—त्या साऱ्या झिडकारून तो काय आईच्या कुशींतच जन्मभर लपून राहणार ?

**आई :** जयंता राहील. त्याला माझ्याखेरीज कुणाची माया लागणार नाहीं.

**रघुनाथ :** आज पंचविसावं वर्ष लागणार त्याला !

**आई :** मग काय झालं ? चोव्वीस वर्षं नाहीं तो माझ्या कुशींत राहिला !



**रघुनाथ :** आणि गेला महिनाभर उशिरां घरीं यायला लागला आहे तो !

**आई :** मग—येईना. पण बाहेर त्याचा जीव राहात नसेल.

**रघुनाथ :** विचारायला हवं त्याला आल्यावर, कीं आतां तुला बाहेर जास्त करमतं कीं घरीं ?—पण मावशी, तूं काय वाटेल तें करून आतां त्याचं लग्न करून टाक. त्याशिवाय कांहीं तो घरीं लवकर यायचा नाहीं ऑफिसांतून. मला दोघां-तिघांनीं विचारलं आहे जयंतासाठीं.

**आई :** अरे, इथं देखील तिघं-चौघं आले होते विचारायला. पण सगळ्यांना नाहीं म्हटलं मीं.

**रघुनाथ :** म्हणजे जयंताला जन्मभर लग्नाशिवायच ठेवणार आहेस कीं काय तूं ?

**आई :** असं कसं करीन मी ? पण मी जितकी त्याच्यावर माया करतें, तितकी बाहेरून आलेली कुठली मुलगी करणार आहे का ? मग कशाला हवं तें लग्न ?

**रघुनाथ :** अग, तूं त्याच्यावर माया खूप करतेस—म्हणून काय आणखी त्याला कांहीं नको असेल ? मला परवां म्हणत होता—

**आई :** काय ?

**रघुनाथ :** कीं आई आपल्या लग्नाची अजून गोष्टच काढीत नाहीं.

**आई :** असं म्हणाला तो ?

**रघुनाथ :** म्हणजे आज पंचविसावं वर्ष लागलं ना त्याला ! असले विचार यायचेच त्याच्या डोक्यांत. विसाव्या वर्षी प्रेमाचे, पंचविसाव्या वर्षी लग्नाचे आणि चाळिसाव्या वर्षी संन्यासाचे विचार माणसाच्या मनांत यायचेच !

**आई :** आला म्हणजे विचारायला हवं त्याला.

**रघुनाथ :** अग, तुला कसं तो सांगेल ?

**आई :** तुला नाहीं का सांगितलं ?

**रघुनाथ :** मी जानीदोस्त आहें त्याचा—तूं आई आहेस. तुला कुठल्या गोष्टीनं बरं वाटेल आणि कुठल्या गोष्टीनं वाईट वाटेल, हें माहित आहे त्याला. नवऱ्याला बायकोकडे आणि मुलाला आईबापाकडे अशा नाटकीपणानं वागावंच लागतं. या लपंडावामुळें तर संसार चालतात !